**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २२० । बुधवार २७ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


### भाजप प्रवेशावर शिक्कामोर्तब

# विधानपरिषदेसाठी नगरमधून प्राजक्त तनपुरेंचे नाव नक्की?

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राहुरी–नगर विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीपासून चर्चेत असलेले माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या भाजप प्रवेशावर जवळपास शिक्कामोर्तब झाले आहे. येत्या एक–दोन दिवसांत ते भाजप प्रवेश करणार असून, विधानपरिषद निवडणुकीच्या तोंडावर होत असलेल्या या घडामोडीमुळे तनपुरेंना विधानपरिषदेची उमेदवारीही नक्की असल्याचे राजकीय वर्तुळातून सांगितले जात आहे.

पुढील महिन्यात होणा–या विधानपरिषद निवडणुकीसाठी अहिल्यानगर मतदारसंघातून अनेक नावे पुढे येत असून, त्यात प्राजक्त तनपुरेंचे नाव आघाडीवर आहे. माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी नुकत्याच पार पडलेल्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत ऐनवेळी थांबण्याचा निर्णय घेतला. निवडणूकपूर्व सर्वेक्षणात तनपुरे आघाडीवर होते, मात्र, निवडणुकीपूर्वी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी त्यांची समक्ष भेट घेतली व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी त्यांचे बोलणे करून दिले. त्यानंतर तनपुरेंनी थांबण्याचा निर्णय जाहीर केला. त्यावेळी भाजपकडून व विशेषतः विखेंकडून त्यांना पुनर्वसनाचा शब्द देण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे विधानपरिषद निवडणुकीसाठी तनपुरेंचे नाव सुरुवातीपासून आघाडीवर आहे.

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीवेळी माघार घेतल्यानंतर तनपुरे हे भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरू होती. त्यावेळी त्यांना पुनर्वसनाचा दिलेला शब्द भाजपकडून विधानपरिषद निवडणुकीची उमेदवारी देऊन पूर्ण केला जाणार असल्याचे राजकीय वर्तुळातून सांगितले जात आहे. आता भाजप प्रवेशावर शिक्कामोर्तब झाल्याने तनपुरे यांना विधानपरिषदेची उमेदवारीही निश्चित झाल्याचे मानले जात आहे.

#### प्रोफाईल फोटो बदलला

राष्ट्रवादीचे (शरदचंद्र पवार गट) आमदार व महाविकास आघाडीच्या काळात राज्यमंत्री राहिलेले प्राजक्त तनपुरे हे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांचे भाचे आहेत. गेल्या काही दिवसांपासून ते मुख्यमंत्री फडणवीसांच्या संपर्कात आहेत. आता भाजप प्रवेशावर शिक्कामोर्तब झाल्याने प्राजक्त तनपुरे यांनी स्वतःचे फेसबुक प्रोफाईल बदलले असून डीपीमध्ये जयंत पाटलांचा फोटो लावला आहे. तनपुरे हे या आठवड्यात उद्या किंवा परवाच भाजपमध्ये प्रवेश करण्याची शक्यता आहे.

### पाईपलाईनरोड येथील गोळीबारप्रकरणी

# भिंगारचे दोघे संशयीत पोलिसांच्या ताब्यात

**गुन्ह्यातील मुख्य मोहरक्याही भिंगारचाच । पोलिस त्याच्याही मागावर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** रविवारी पाईपलाईनरोड येथे झालेल्या गोळीबारप्रकरणी तोफखाना पोलिसांनी भिंगारच्या दोघा संश्यीतांना ताब्यात घेतले आहे.त्याची कसुल चौकशी सुरु असून त्यांचा मोहरक्या अद्यापही फरार असून पोलिस त्याच्या मागावर आहेत.

रविवारी (दि. २४ ) रोजी चहा पिताना जुन्या वादानंतर एका टोळीने दहशत निर्माण करण्यासाठी सकाळी हवेत गोळीबार केला होता. त्याच्या पुंगळया तेथे पडल्याने काही जणांच्या लक्षात आल्यावर पोलिसांना ही माहिती देण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपासाची चक्री फिरविली. या संदर्भात तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी त्या गुन्ह्यातील आरोपींना पकडणयात पोलिसांना यश आले नव्हते. या गुन्ह्याच्या तपासकामी तोफखाना पोलिसांसह एलसीबीच्या पोलिसांनीही कंबर कसली होती. मात्र आज (दि.२७) पोलिसांनी भिगारमध्ये वास्तव्यास असलेल्या दोघा संश्यीतांना ताब्या घेण्यात आले आहे. दुपारी या आरोपींची कसुन चौकशी सुरु होती. त्यांनी हे कृत्य कशासाठी केले याचा पोलिस आरोपींकडून उलगडा केला जात असून या गुन्ह्यात आणखी एक आरोपी असून तो या गुन्ह्यात मुख्य आरोपी असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.

### बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाचा निर्णय

# एसपीओ चौक ते जीपीओ चौक यादरम्यान वाहतूक मार्गात बदल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** उद्या,दिनांक २८ रोजी साज–या होणा–या बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर नगर शहरातील एसपीओ चौक ते जीपीओ चौक या दरम्यानच्या वाहतूक मार्गात तात्पुरता बदल करण्यात आला आहे.

बकरी ईदला कोठला ईदगाह मैदान या ठिकाणी नमाज पठण करण्यात येणार आहे. इदगाह मैदान हे नगर–पुणे महामार्गालगत आहे. त्यामुळे येणाऱ्या–जाणाऱ्या वाहनांच्या कर्कश आवाजाने नमाज पठणात व्यत्यय येतो. तसेच नमाज पठणास मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्याकरिता दि. २८ रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत नगर–पुणे मार्गावरील एसपीओ चौक ते जीपीओ चौक या रस्त्यावरील सर्व प्रकारची वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. हा आदेश शासकीय वाहने, रुग्णवाहिका, अग्निशमन व स्थानिक प्रशासनाने अत्यावश्यक कारणास्तव परवानगी दिलेल्या वाहनांना लागू राहणार नाही.



#### पर्यायी वाहतुकीचा मार्ग

१) संभाजीनगर तसेच मनमाडकडून येणा–या वाहनांकरिता पर्यायी मार्ग –

एसपीओचौक–न्यायनगरमार्गे–बेलेश्वर चौक–किल्ला चौक–जीपीओ चौक–चांदणी चौक यामार्गे इच्छित स्थळी.

२) सोलापूर रस्ता– जामखेड तसेच पुण्याकडून येणारी वाहने जीपीओ चौक–बेलेश्वर चौक–न्यायनगर–एसपीओ चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

३) पुण्याकडून उड्डाणपुलाचा वापर करुन येणारी वाहने चांदणी चौक येथे उतरणा–या उड्डाणपुल मार्गाचा वापर करुन चांदणी चौक–जीपीओ चौक–बेलेश्वर चौक– न्यायनगर–एसपीओ चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

# नेवाशात अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

**एलसीबीच्या कारवाईत साडेअठरा लाखांचा मुद्देमाल जप्त**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेवासा तालुक्यातील गणेशवाडी येथे वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरूध्द स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करून १८ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. दिनांक २६ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सोनई हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत असताा पथकास सोनई ते गणेशवाडी रोडने गणेशवाडी शिवारात चारचाकी वाहनातून चोरुन वाळूची वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली. पथकाने गणेशवाडी शिवारात हॉटेल कैलासजवळ सापळा रचला असता तीन संशयित वाहने येताना दिसली. तीन वाहनांत तीन ब्रास वाळू आढळून आली. आरोपी वाहनचालक किरण बाबासाहेब सिसोदे (वय–२५ वर्षे रा. खलालपिप्री, ता.नेवासा), विवेक दत्तात्रय शिंदे (वय–१९ वर्षे, रा. निपाणी निमगाव ता. नेवासा) व बाळासाहेब पुंडलिक नळगे (वय–४२ वर्षे, रा. बहिरवाडी ता.नेवासा) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून १८ लाख रुपये किमतीची तीन वाहने, तीन ब्रास वाळू व तीन मोबाईल असा एकूण १८ लाख ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.आरोपीविरुध्द सोनई पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गोदावरी पात्रातून तीन ट्रॅक्टरसह साडेपंधरा लाखांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव येथे गोदावरी नदीपात्रातून वाळूचा अवैध उपसा करणाऱ्यांविरूध्द स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करून तीन ट्रॅक्टरसह एकूण १५ लाख ७५ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी चारजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमर माधव मेहेरखांब (वय–३० वर्षे रा. सुरेगाव ता. कोपगांव), राहुल चांगदेव पगारे (वय–२० वर्षे रा. वेळापूर ता. कोपरगांव) अशी अटक आरोपींची नावे असून, त्यांचे साथीदार सचिन हरीभाऊ मेहेरखांब व वैभव भाऊसाहेब गिरी ■ पान ४ वर

# पुण्याच्या आंदेकर टोळीतील पाचजण मिरावली पहाड परिसरातून अटकेत

**एलसीबीच्या कारवाईत चार गावठी कट्ट्यांसह पावणेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुणे येथील कुख्यात आंदेकर टोळीतील कोयता गँग दरोड्याच्या तयारीत असतांना नगर शहर परिसरातून जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. आरोपींकडून ४ गावठी कट्टे, १० जिवंत काडतुसासह २ लाख ७६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २६ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना मिलिट्री इंटेलिजेन्स, साउथ कमांड, अहिल्यानगर इनपुट यांच्याकडून मिरावली पहाडाच्या पायथ्याजवळ, बुऱ्हाणनगर रोड, भिंगार या ठिकाणी काही इसम अग्नीशस्त्रासह दरोडा घालण्याच्या तयारीत थांबलेले असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार पथकाने खात्री केली असता पाचजण संशयितरित्या उभे असल्याचे दिसून आले. पथक त्यांना ताब्यात घेण्यासाठी जात असतांना त्यातील एक इसम मोटार सायकलवर भरधाव वेगात पळून गेला. पथकाने उर्वरीत इसमांचा पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेतले असून त्यांची नावे मुस्ताक ईब्राहीम शेख ■ पान ४ वर



#### पथकात यांचा सहभाग

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक अनंत सालगुडे, राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार गणेश धोत्रे, सुनील पवार, विष्णू भागवत, शाहिद शेख, प्रकाश मांडगे, बाळासाहेब गुंजाळ, प्रशांत राठोड यांनी केली.

#### तीन दिवसांचा पीसीआर, पाचवा आरोपी जेरबंद

गुन्ह्याच्या तपासा दरम्यान, अटक चार आरोपींना न्यायालयासमोर उभे केले असता त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली, तर पथकाने गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत असतांना पळून गेलेला आरोपी आकाश संजय पवार याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून तीन गावठी कट्टे व नऊ जीवंत काडतुसे असा १ लाख ५९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# शवविच्छेदनासाठी पैशांची मागणी

**पारनेरच्या ग्रामीण रुग्णालयात राष्ट्रवादी काँग्रेसचे ठिय्या आंदोलन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी मृतांच्या नातेवाईकांकडून पैशांची मागणी होत असल्याच्या गंभीर आरोपांप्रकरणी बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस व विविध सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने आंदोलन करण्यात आले. मंगळवारी पारनेर शहरातील एका तरुणाने आत्महत्या केल्यानंतर त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला होता. मात्र शवविच्छेदनासाठी टाळाटाळ करण्यात येत असल्याचा आरोप करत संतप्त तरुणांनी रुग्णालय प्रशासनाविरोधात ठिय्या आंदोलन छेडले.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, रात्रीच्या वेळी शवविच्छेदन करता येणार नसल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर पोलिस प्रशासनाचे पत्र आवश्यक असल्याचे, संबंधित कर्मचारी उपलब्ध नसल्याचे तसेच शवविच्छेदनासाठी आवश्यक मेडिकल किट नसल्याची कारणे पुढे करण्यात आली. अखेर कर्मचारी बोलावण्यासाठी वाहनखर्च व इतर रकमेची मागणी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. मेडिकल किटच्या नावाखालीही पाच हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याने उपस्थित तरुणांमध्ये संतापाची लाट उसळली.



राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. बाळासाहेब कावरे यांनी या प्रकारामागे ग्रामीण रुग्णालयातील कथित रॅकेट कार्यरत असल्याचा गंभीर आरोप केला. मृतांच्या नातेवाईकांच्या दुःखाचा गैरफायदा घेत आर्थिक लूट सुरू आहे. या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

आंदोलनादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, नगरसेवक योगेश मते, डॉ. सचिन औटी, भूषण शेलार, सुभाष शिंदे, राजू शेख, विजय भास्कर औटी, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष वैभव औटी, विजय डोळ, राजेंद्र शेरकर, सतीश म्हस्के, राहुल बुगे, अक्षय औटी, किरण चौधरी, उत्कर्ष ठोकळ, अनिकेत साबळे, ऋतिक गायकवाड, शुभम जगताप, योगेश व्यवहारे, गणेश गजभिव, राहुल चौरे, शशीकांत औटी, जुनेद राजे, गौरव श्रीमंदीलकर आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंदोलनाची माहिती मिळताच खासदार नीलेश लंके यांचे बंधू दीपक लंके यांनी ग्रामीण रुग्णालयात भेट देत आंदोलनकर्त्यांना पाठिंबा दिला. मृतांच्या ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शनाचे आयोजन

अहिल्यानगर - ज्ञान हे यशस्वी जीवनाचे



मूलभूत अधिष्ठान मानले जाते. १९ व्या शतकातील दिव्य विभूती राष्ट्रसंत आचार्य सम्राट प पू श्री आनंदऋषिजी म सा यांनी आपल्या आयुष्यात त्याग आणि संयमासोबतच ज्ञानप्राप्तीला विशेष महत्त्व दिले होते. जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत त्यांनी ज्ञानयज्ञ अखंड प्रज्वलित ठेवला. त्याच पावन प्रेरणेतून आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक पू श्री कुंदनऋषिजी म सा, प्रबुद्ध विचारक श्री आदर्शऋषिजी म सा तसेच संस्कार दिवाकर पू श्री आलोकऋषिजी म सा यांच्या सान्निध्यात श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड आणि महावीर सेना यांच्या संयुक्त विद्यमाने १० वी व १२ वी परीक्षेत विशेष गुणवत्ता प्राप्त सकल जैन समाजातील अहिल्यानगर येथील विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमात बहुआयामी व्यक्तिमत्त्व प्रोफेसर डॉ. अशोककुमारजी पगारिया विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. पगारिया हे पुणे येथील भगवान महावीर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष असून, ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स, दिल्ली या संस्थेचे माजी राष्ट्रीय महामंत्री तसेच वर्तमान सकल प्रांत जैन भवन योजना अध्यक्ष आहेत. याशिवाय ते अहिल्यानगर येथील आनंद नवकार परिवार ट्रस्टचे कार्याध्यक्ष असून प्रख्यात चार्टर्ड अकाउंटंट म्हणूनही परिचित आहेत.हा सत्कार व मार्गदर्शन समारंभ रविवार, ३१ मे २०२६ रोजी सकाळी ८.३० ते १०.३० या वेळेत आनंदधाम येथे होणार आहे. या कार्यक्रमास अहिल्यानगर शहरातील सकल जैन समाजातील विद्यार्थी, विद्यार्थीनी आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड व महावीर सेना व श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने ‘अंतर्ज्ञान प्रक्रिया शिबिराचे आयोजन




अहिल्यानगर - आर्ट ऑफ लिव्हिंग - अहिल्यानगरच्या वतीने विद्यार्थ्यांच्या मानसिक, बौद्धिक आणि अंतर्ज्ञान विकासासाठी ‘‘इंट्यूशन प्रोसेस’’ या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २९ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत होणाऱ्या या शिबिरात ८ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार असून, जास्तीत जास्त पालकांनी आपल्या पाल्यांना या उपक्रमात सहभागी करण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धात्मक युगात मुलांमध्ये आत्मविश्वास, एकाग्रता आणि योग्य निर्णयक्षमता विकसित होणे आवश्यक बनले आहे. याच उद्देशाने आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून ‘‘इंट्यूशन प्रोसेस’’ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या शिबिरामध्ये मुलांच्या सुप्त अंतर्ज्ञान शक्ती जागृत करण्यासाठी विविध तंत्रांचा उपयोग केला जाणार आहे. संस्थेच्या वतीने सांगण्यात आले की, प्रत्येक मुलामध्ये नैसर्गिकरित्या अंतर्ज्ञानी क्षमता असते. योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाद्वारे ही क्षमता अधिक प्रभावीपणे विकसित करता येते. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांना सहावे इंद्रिय विकसित करणे, फोटोग्राफिक मेमरी वाढविणे, अभ्यासातील एकाग्रता सुधारणे, अज्ञात भीती कमी करणे, आत्मविश्वास वाढविणे, घ्या ज्ञानेद्रिये क्षमता वाढणे तसेच सर्जनशील विचारशक्ती विकसित होऊन अभ्यासात सुधारणा तसेच चांगल्या सवयी लागतात, कार्यक्रम नंतर दररोज मुलांची ऑनलाईन प्रॅक्टिस घेतली जाते, तसेच साप्ताहिक उजळणी देखील घेतली जाते. यापूर्वी आर्ट ऑफ लिव्हिंगचे अहिल्यानगर केंद्र गावडे मळा आणि मिस्किन मळा, सावेडी येथे आयोजन झालेले आहे, पालकांच्या आग्रहास्तव आता शहराच्या मध्यवर्ती या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चोंडीत कार्यक्रमांची रेलचेल


## १२०० कोटींच्या शिल्पसृष्टी विकास आराखड्याचे भूमिपूजन; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रींसह मान्यवरांची उपस्थिती | विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली माहिती

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त श्री क्षेत्र चोंडी, ता. जामखेड येथे दि. ३० व ३१ मे २०२६ रोजी राज्यस्तरीय भव्य-दिव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, दोन दिवस चालणाऱ्या या जयंती महोत्सवात सांस्कृतिक, ऐतिहासिक व विकासात्मक कार्यक्रमांची मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत विधान परिषदेचे सभापती आमदार प्रा. राम शिंदे यांनी संपूर्ण कार्यक्रमाची सविस्तर माहिती देत, हा सोहळा राज्याच्या सांस्कृतिक इतिहासातील अविस्मरणीय पर्व ठरणार असल्याचे सांगितले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाला राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री मा. ना. सुनेत्राताई पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये पंकजाताई मुंडे, शिवेंद्रसिंहराजे भोसले, जयकुमार गोरे, दत्तात्रय भरणे, अतुल सावे तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह जिल्ह्यातील खासदार, आमदार आणि समाजातील आजी-माजी लोकप्रतिनिधींचा सहभाग राहणार असल्याची माहिती देण्यात आली.

प्रा. राम शिंदे यांनी सांगितले की, राज्य शासनाने ६ मे २०२५ रोजी चोंडी येथे विशेष मंत्रिमंडळ बैठक घेऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सवाच्या अनुषंगाने ऐतिहासिक निर्णय घेतला होता. या बैठकीत चोंडी येथे उभारण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शिल्पसृष्टीच्या तब्बल १२०० कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला मान्यता देण्यात आली. याच विकास आराखड्यातील पहिल्या टप्प्यातील विविध कामांचे भूमिपूजन जयंती दिनी मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. त्यामुळे चोंडीच्या विकासाला नवे ऐतिहासिक वळण मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



दि. ३० मे रोजी जयंतीच्या पूर्वसंध्येला सांस्कृतिक कार्यक्रमांची सुरुवात होणार असून, रात्री ८ ते ११ या वेळेत देशातील सुप्रसिद्ध हिंदी कवी डॉ. कुमार विश्वास यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य कवी संमेलन रंगणार आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कवी संमेलनात कवयित्री नेहा गोधटे, डॉ. भुवन मोहिनी, शिखा अवधेश, साक्षी तिवारी, सानिया राय आणि शारदा पोफडी या मान्यवर कवयित्री सहभागी होणार असून, देशभक्ती, सामाजिक जाणिवा आणि संस्कृतीचा संगम असलेली काव्य मैफल रसिकांना अनुभवायला मिळणार आहे.

कवी संमेलनानंतर रात्री ११ ते ११.३० या वेळेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ड्रोन शो सादर करण्यात येणार आहे. या शोमध्ये देशातील प्रख्यात शिवमंदिरे, जेजुरी गड, चोंडी स्मारकाचे डिझाईन तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याचा भव्य जीवनपट आकाशात साकारला जाणार आहे. त्यानंतर रात्री १२ वाजता जयंतीनिमित्त आकर्षक शोभेच्या फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येणार असून, संपूर्ण परिसर रोषणाईने उजळून निघणार आहे.

दि. ३१ मे रोजी सकाळी ११.१० ते ११.५० या वेळेत नियोजित शिल्पसृष्टीच्या विकास आराखड्यातील विविध कामांचे भूमिपूजन पार पडणार आहे. या भूमिपूजनामुळे चोंडी हे ठिकाण भविष्यात जागतिक पर्यटन नकाशावर ठळकपणे झळकणार असल्याचा विश्वास प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केला. ऐतिहासिक वारसा जपत आधुनिक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने हा आराखडा अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

यानंतर दुपारी १२ ते २.३० या वेळेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त अभिवादन सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेत राज्यातील विविध मान्यवर मार्गदर्शन करणार असून, अहिल्यादेवींच्या कार्याचा आदर्श समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. समाजकारण, न्यायव्यवस्था, महिला सक्षमीकरण, धर्मसंवर्धन आणि लोककल्याणकारी राज्यकारभार या क्षेत्रात अहिल्यादेवींनी दिलेला आदर्श आजही प्रेरणादायी असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात येणार आहे.

पत्रकार परिषदेत प्रा. राम शिंदे यांनी सांगितले की, हा कार्यक्रम केवळ जयंती उत्सव नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा गौरव सोहळा आहे. चोंडी हे पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे जन्मस्थान असल्यामुळे या भूमीला ऐतिहासिक महत्त्व आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या सहकार्याने हा महोत्सव भव्य स्वरूपात साजरा करण्यात येत आहे. कार्यक्रमासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने नागरिक, समाजबांधव व भाविक उपस्थित राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासन, पोलीस यंत्रणा, विविध विभाग तसेच जयंती उत्सव समितीच्या वतीने व्यापक नियोजन करण्यात आले असून, येणाऱ्या नागरिकांसाठी वाहतूक, पार्किंग, पिण्याचे पाणी, निवास व सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहितीही पत्रकार परिषदेत देण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त आयोजित हा राज्यस्तरीय महोत्सव ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि विकासात्मक दृष्टिकोनातून महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण ठरणार असून, चोंडी नगरी दोन दिवस राज्याच्या राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक केंद्रबिंदू ठरणार आहे.

जागतिक महिला दिन ८ मार्च निमित्त गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात, ७ मार्च २०२५ रोजी विधानपरिषद सभागृहात, माननीय सभापती प्रा. राम शिंदे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्म त्रिशताब्दीनिमित्त अभिवादन प्रस्तावावर बोलतांना महत्वपूर्ण विचार मांडले. न्यायप्रिय, कृषीपूरक, पर्यावरणहितकारी, धर्मरक्षक आणि महिला समानाधिकार ही अहिल्यादेवी यांच्या लोककल्याणकारी राज्यकारभाराची वैशिष्ट्ये यावेळी सभापती महोदयांनी आपल्या भाषणात अधोरेखित केली.आज दिनांक ३१ मे २०२६ रोजी चोंडी या जन्मस्थळी आपण माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या प्रमुख उपस्थितीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती साजरी करीत आहोत, त्यानिमित्त या भाषणातील काही अंश लेख स्वरूपात देत आहोत.

# शब्दगंध साहित्य संमेलनात कथालेखक बाळासाहेब देशमुख यांच्या माणसं अशी अन् तशीही.. कथासंग्रहाचे प्रकाशन



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शब्दगंध साहित्यिक परिषद चे १७ वे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन अहिल्यानगर येथे नुकतेच संपन्न झाले. संमेलनाध्यक्षपदी प्रा. डॉ. संदीप सांगळे हे होते.

पुस्तक प्रकाशन सोहळा अध्यक्षपदी प्रा. डॉ.अशोकराव ढगे माजी कुलगुरू हे होते. या प्रसंगी, कथालेखक बाळासाहेब देशमुख यांच्या माणसं अशी.. अन् तशीही.. या कथासंग्रहाचे प्रकाशन, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ.बाळासाहेब सागडे यांच्या शुभहस्ते झाले.

याप्रसंगी बोलताना ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे म्हणाले लेखकाची लेखणी संवेदनशील, समाजाभिमुख व वास्तवतेचे भान ठेवणारी असावी. मग ती साहित्यकृती वाचकांच्या मनात घर करून राहते.

लेखकाने समाजातील घटनांचा वेध घेत, अनिष्ट गोष्टींवर प्रहार करायला हवा. लेखन समतोल, सातत्यपूर्ण आणि सर्जनशील असावे.याप्रसंगी जयंत येलूलकर विभागीय कार्यवाहक मसाप पुणे, प्रभाकर सूर्यवंशी संपादक अभिनव खानदेशी धुळे, प्रा. डॉ. किशोर धनवटे, बबनराव गिरी, शब्दगंध अध्यक्ष राजेंद्र उदागे, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे ,संस्थापक सचिव सुनील गोसावी ,इत्यादी मान्यवर व्यासपीठावर हजर होते.

बाळासाहेब देशमुख यांचा या अगोदर रंग माझा वेगळा हा कथासंग्रह प्रसिद्ध झालेला आहे. त्यांचा तिसरा कथासंग्रह माणसं भिंगातून लवकरच येत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ साहित्यिका शर्मिला गोसावी, स्वाती पाटील यांनी केले.

# देवीभोयरे-शिवडोह लिंक कॅनॉल कामाला गती

## जलसंपदामंत्र्यांकडून तातडीच्या कार्यवाहीचे आदेश



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पारनेर –** पारनेर तालुक्यातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या देवीभोयरे- शिवडोह लिंक कॅनॉल प्रश्नावर आज महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून या प्रश्नाला अखेर गती मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. देवीभोयरे व वडझिरे परिसरातील शेतकऱ्यांनी लिंक कॅनॉलचे काम तातडीने मंजूर करून सक्तीने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करत प्रकल्प मार्गी लावावा, या मागणीसाठी उपोषणाचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर प्रशासन व शासन स्तरावर तातडीच्या हालचाली सुरू झाल्या.

आज कृष्णा खोरे प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता अक्षय बरकले यांनी संबंधित शेतकऱ्यांना मंचर येथे चर्चेसाठी बोलावून घेतले. यावेळी पंधरा दिवसांच्या आत भूसंपादन प्रक्रियेबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. यानंतर या प्रश्नाला अधिक गती मिळाली. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने यापूर्वी जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. शेतकऱ्यांच्या अडचणी व पाण्याचा गंभीर प्रश्न लक्षात घेऊन दाते सरांनी शासन दरबारी वेळोवेळी पाठपुरावा करत हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटीलांनी देवीभोयरे व वडझिरे येथील नागरिकांसमोरच मुख्य अभियंता चोपडे व धुमाळ यांना लिंक कॅनॉलचे काम तातडीने मंजूर करून सक्तीने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करत काम मार्गी लावण्याचे स्पष्ट आदेश दिले.

यावेळी जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, अंबिका माता ट्रस्ट अध्यक्ष शिवाजीराव जाधव, विश्वनाथ गाजरे गुरुजी, मा. उप सरपंच विकास सावंत, बाबुराव मुळे, व्हा. चेअरमन गोपीचंद बेलोटे, मा. उपसरपंच दत्तात्रय दौलत बेलोटे, सुभाष किसन बेलोटे, बाबुराव एकनाथ बेलोटे, अक्षय राजाराम बेलोटे, भाऊसाहेब पोपट सरडे, कमलाकर लहू बेलोटे, यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

**मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी व ग्रामस्थांचे संवेदनशील प्रश्न, पाणी, सिंचन, शेती व विकासकामांशी संबंधित प्रश्न केवळ बैठकीपुरते मर्यादित न ठेवता संबंधित विभागांकडे सातत्याने माझा पाठपुरावा आहे, देवीभोयरे-शिवडोह लिंक कॅनॉलसारखा रखडलेला प्रश्न मार्गी लागण्यासाठी शेतकऱ्यांच्या भावना शासनापर्यंत पोहोचवत जलसंपदामंत्री विखे पाटीलांशी सातत्याने चर्चा केली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना हे काम तातडीने मंजुर करुन मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या, मतदारसंघातील नागरिकांना न्याय मिळावा, शेतीला पाणी मिळावे आणि ग्रामीण भागाचा विकास व्हावा यासाठी माझा संघर्ष असेल.**

**आमदार काशिनाथ दाते सर**
**(विधानसभा सदस्य)**

# धोंड्याच्या एकादशी पर्वानिमित्त पैठणमध्ये भक्तांची गर्दी

## नाथ समाधी दर्शनासाठी हजारो भाविकांची उपस्थिती

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**पैठण –** दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या पैठण नगरीत सध्या अधिक मास अर्थात धोंड्याच्या महिन्यानिमित्त धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे. दर तीन वर्षांनी येणाऱ्या या पवित्र महिन्यात विविध धार्मिक कार्यक्रम, जप-तप, नामस्मरण, प्रवचन, कीर्तन व ग्रंथ वाचनाचे आयोजन करण्यात येत असून भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी होत आहेत.

अधिक मासातील एकादशीला विशेष धार्मिक महत्त्व असल्याने बुधवारी (दि.२७) पहाटेपासूनच मराठवाड्यातील विविध भागांतून भाविकांनी पैठणकडे धाव घेतली. भाविकांनी प्रथम गोदावरी नदीत स्नान करून श्री संत एकनाथ महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यानंतर शहरातील विविध मंदिरांमध्ये जाऊन देवदेवतांचे दर्शन घेत भक्तीभाव व्यक्त केला. प्रखर उन्हाची तमा न बाळगता हजारो भाविक पैठणमध्ये दाखल झाले होते. दिवसभर दर्शनासाठी भाविकांची वर्दळ कायम होती. शहरातील विविध मठ-मंदिरांमध्ये भजन, कीर्तन, हरिनाम सप्ताह, धार्मिक प्रवचने आदी कार्यक्रम भक्तीमय वातावरणात पार पडले. एकादशी निमित्त संतनगर परिसरात छोटेखानी यात्रेचे स्वरूप निर्माण झाले होते. गर्दीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पैठणचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. प्रमुख मंदिर परिसर, घाट परिसर तसेच गर्दीच्या ठिकाणी पोलिसांनी विशेष लक्ष ठेवले होते.

धार्मिक उत्साह, भक्तिरस आणि हरिनामाच्या गजराने संपूर्ण पैठण नगरी दुमदुमून गेली होती. धोंड्याच्या महिन्यात पैठणमध्ये पारंपरिक पद्धतीने साजरे होणारे धार्मिक उत्सव भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहेत.

# पैठण औद्योगिक वसाहतीच्या प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर

## शेतकरी, नागरिक आक्रमक; प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण –** औद्योगिक वसाहतीमुळे परिसरातील गावांवर वाढत्या प्रदूषणाचा परिणाम होत असल्याने शेतकरी व नागरिकांनी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त केली. औद्योगिक वसाहत प्रदूषणमुक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सोमवारी तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत करण्यात आली. ही बैठक तब्बल अडीच ते तीन तास चालली. पैठण-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील मुधलवाडी शिवारात १९७६ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत औद्योगिक वसाहतीची उभारणी करण्यात आली. सुरुवातीला अनेक लघु व मोठे उद्योग येथे सुरू झाले. मात्र, कालांतराने अनेक उद्योग बंद पडले. त्यानंतर रासायनिक उद्योगांमुळे परिसरातील शेती, पाणी व नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचा मुद्दा वारंवार पुढे येत आहे. दरम्यान, पैठण तहसील कार्यालयात मनाक्षी अँग्रो कंपनीच्या प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात सादरीकरण करण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी निलम बाफना या होत्या. विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत नागरिकांनी औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्याची मागणी केली. दर दोन महिन्यांनी कंपन्यांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी व प्रशासन यांची संयुक्त बैठक घ्यावी, तसेच स्थानिक सुशिक्षित बेरोजगार युवकांना उद्योगांमध्ये कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली. उपविभागीय अधिकारी निलम बाफना यांनी औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे सांगितले. मनाक्षी अँग्रो कंपनीच्या अधिकाऱ्यांनीही प्रस्तावित प्रकल्प प्रदूषणमुक्त राहील, अशी ग्वाही दिली.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांची तत्परता; सापाला सुरक्षित पकडून निसर्गात मुक्त



अहिल्यानगर - भिंगार येथील गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये सकाळी व्यायामासाठी आलेल्या नागरिकांमध्ये अचानक साप दिसल्याने काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी प्रसंगावधान राखत सापाला सुरक्षितपणे पकडून पुन्हा नैसर्गिक अधिवासात मुक्त केले. या घटनेमुळे पर्यावरण आणि वन्यजीव संवर्धनाबाबत सकारात्मक संदेश देण्यात आला. भिंगार परिसरातील गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये दररोजप्रमाणे हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य सकाळी व्यायाम, योगा आणि आरोग्यविषयक उपक्रमांसाठी एकत्र आले होते. याच दरम्यान पार्क परिसरात अचानक साप दिसून आला. साप दिसताच काही नागरिक आणि व्यायामासाठी आलेले सदस्य घाबरून गेले. काही काळ परिसरात गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. मात्र, हरदिन ग्रुपचे सदस्य सुधीर कपाले यांनी धाडस आणि संयम दाखवत त्या सापाला कोणतीही इजा न होता सुरक्षितरीत्या पकडले. त्यांनी प्लास्टिकच्या बाटलीच्या साहाय्याने सापाला अलगद पकडून नियंत्रणात आणले. त्यानंतर ग्रुपच्या सदस्यांनी मिळून त्या सापाला जंगलमय आणि सुरक्षित नैसर्गिक परिसरात नेऊन पुन्हा मुक्त केले. या वेळी संजयजी सपकाळ, अशोकराव पराते, अविनाश जाधव यांच्यासह हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. ते पुढे म्हणाले की, ''सध्या उन्हाळ्याच्या दिवसांत तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे सापांसारखे सरपटणारे प्राणी पाण्याच्या, ओलाव्याच्या आणि भक्ष्याच्या शोधात बिळांमधून बाहेर पडून मानवी वस्त्यांकडे वळतात. अशा वेळी भीतीपोटी अनेकदा नागरिक सापांना मारण्याचा प्रयत्न करतात. मात्र, साप हा पर्यावरण साखळीतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता तत्काळ सर्पमित्रांना संपर्क साधावा आणि त्या प्राण्याला सुरक्षितपणे पुन्हा निसर्गात सोडण्यासाठी सहकार्य करण्याचे त्यांनी सांगितले.

### साई सेवा पतसंस्था घोटाळा : कोर्टाचा आदेश असूनही गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई




अहिल्यानगर - साई सेवा पतसंस्था प्रकरणात जिल्हा न्यायाधीश, श्रीगोंदा यांनी दिलेल्या आदेशानंतरही संबंधितांविरोधात अद्याप गुन्हा दाखल न झाल्याने ठेवीदारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कोर्टाच्या स्पष्ट आदेशानंतरही पोलिस प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप होत असल्याची चर्चा ठेवीदारांमध्ये रंगू लागली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २२ मे २०२६ रोजी जिल्हा न्यायाधीश, श्रीगोंदा यांनी साई सेवा पतसंस्थेच्या सर्व २१ संचालकांविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश श्रीगोंदा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक यांना दिले होते. या आदेशानंतर ठेवीदारांनी मोठा जल्लोष साजरा करत दिनांक २५ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता संबंधित आदेशाची प्रत पोलिस निरीक्षक शिंदे यांच्याकडे सुपूर्त केली होती. मात्र आदेश सुपूर्त करून २४ तासांहून अधिक कालावधी उलटल्यानंतरही अद्याप कोणतीही फिर्याद दाखल करण्यात आलेली नसल्याने ठेवीदार संभ्रमित झाले आहेत. पोलिस प्रशासनाच्या या भूमिकेमुळे अनेक प्रश्न उपस्थित केले जात असून, काही ठेवीदारांनी या प्रकरणात राजकीय दबाव अथवा हस्तक्षेप होत असल्याची शक्यता व्यक्त केली आहे.

# मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली बुद्धिबळ स्पर्धेचे बुद्धिबळ पटावर चाल देऊन शुभारंभ

## रशियन ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव यांचे आकर्षण | आमचा उद्देश फक्त स्पर्धा घेणे नसून खेळाडू घडवणे आहे – नरेंद्र फिरोदिया

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात झाला. रशियन ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव आणि अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, स्टेशन रोड येथे आयोजित या स्पर्धे ला देशभरातील बुद्धिबळपटू, पालक आणि बुद्धिबळप्रेमींची मोठी उपस्थिती लाभली होती. या स्पर्धेत देशाच्या विविध राज्यातून २७५ पेक्षा अधिक खेळाडू सहभागी आहेत. या स्पर्धेत १४० आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी आहेत.यावेळी संघटनेचे सचिव यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, पारूनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी आदी उपस्थित होते.

स्पर्धेबाबत माहिती देताना अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, देशभरातील नामांकित बुद्धिबळपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला असून गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, महाराष्ट्र आदी राज्यांतील पेक्षा २७० अधिक खेळाडूंनी सहभाग निश्चित केला आहे. अवघ्या साडेपाच



वर्षांच्या बाल बुद्धिबळपटूपासून ते ९२ वर्षीय ज्येष्ठ खेळाडूपर्यंत विविध वयोगटातील स्पर्धक आपल्या बुद्धीचे कौशल्य पणाला लावणार असुन ते पुढे म्हणाले, अहिल्यानगरमध्ये प्रथमच इतक्या मोठ्या स्तरावरील फिडे रेटिंग स्पर्धा होत आहे. बुद्धिबळाचा प्रसार आणि प्रचार वाढवण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून शंभर चेस बोर्ड खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आमचा उद्देश केवळ स्पर्धा घेणे नसून उत्कृष्ट खेळाडू घडवणे हा आहे. यंदा रशियन ग्रँड मास्टर यांना बोलावून विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले असून त्याचा खेळाडूंना मोठा फायदा होणार असल्याची भावना व्यक्त केली तर संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी प्रस्ताविकात सांगितले की, या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण म्हणजे रशियन ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव यांचा सहभाग होय. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेचा दर्जा अधिक उंचावला आहे. विशेष म्हणजे त्यांनी एकाचवेळी ३० खेळाडूंविरुद्ध प्रदर्शनीय सामना खेळून उपस्थितांची मने जिंकली. ते पुढे म्हणाले की, ''ही स्पर्धा पाच दिवस चालणार असून हा कार्यक्रम आम्ही लग्नसोहळ्यासारखा आनंदाने साजरा करतो. लवकरच नरेंद्र फिरोदिया चषक' बिलो १७००' स्पर्धाही आयोजित करण्यात येणार आहे. खेळाडूंसाठी सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे.''

या स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून प्रवीण ठाकरे, पवन राठी, शिरीष इंदुरकर, शार्दुल तपासे, अमरीश जोशी, देवेंद्र ढोकळे, प्रशांत धंगेकर, विशाल गुजराती काम पाहणार आहेत.

विशेष बाब म्हणजे या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे १०० लाकडी बुद्धिबळ पट आणि सोंगट्यांचा वापर महाराष्ट्रात प्रथमच करण्यात येत आहे.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संघटनेचे खजिनदार सुबोध ठोंबरे, सदस्य पारूनाथ ढोकळे, शाम कांबळे, प्रशांत धंगेकर, देवेंद्र ढोकळे, मनीष जस्वानी, प्रकाश गुजराती, चेतन कड, विशाल गुजराती संजय खडके, नवनीत कोठारी, डॉ. स्मिता वाघ, अनुराधा बापट, सौ. शुभदा ठोंबरे, सौ. रोहिणी आडकर , दत्ता घाडगे, स्वप्नील भगुरकर आदी परिश्रम घेत आहेत.

# 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' प्राप्त संगीता मालकर यांचा गौरव

## सामाजिक व शैक्षणिक कार्याचा सन्मान



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागातर्फे सन २०२४-२५ या वर्षासाठी प्रदान करण्यात आलेला जिल्हास्तरीय 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संगीता मालकर यांचा आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने शहर बँकेचे व्हाइस चेअरमन तथा श्री विशाल गणपती मंदिराचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते यांनी सत्कार केला.

या सत्कार समारंभाप्रसंगी आंतरराष्ट्रीय खेळाडू आप्पासाहेब ढूस, शिवाजी घाडगे, कारभारी गरड, चंद्रकांत सोनार यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक व बँकिंग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी संगीता मालकर यांना श्री विशाल गणेशाची प्रतिमा, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रा. माणिक विधाते म्हणाले की, संगीता मालकर या महिला सक्षमीकरणासाठी निस्वार्थ भावनेने काम करत आहे. केवळ शिक्षिका म्हणून नव्हे, तर समाजातील वंचित, गरजू आणि एकल महिलांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणाऱ्या कार्यकर्त्या म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' हा केवळ पुरस्कार नसून समाजसेवा, स्त्री सक्षमीकरण आणि लोकहितासाठी झटणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा सन्मान आहे. हा पुरस्कार संगीता मालकर यांना मिळणे म्हणजे त्यांच्या अनेक वर्षांच्या समर्पित कार्याची पावती आहे. त्यांनी शिक्षक गुणगौरव पुरस्कारातून मिळालेली मोठी रक्कम गरजू महिलांसाठी शिवणयंत्रे खरेदी करून खर्च केली. ही बाब त्यांच्या संवेदनशीलतेचे आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रतीक आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना नवे आयुष्य मिळाले असून अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

संगीता मालकर या कोपरगाव येथील श्रीमान गोकुळचंदजी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत असून गेल्या ३६ वर्षांपासून त्या शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. शिक्षणाबरोबरच त्यांनी सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य उभे केले आहे. त्या सावित्रीबाई फुले ज्ञानदीप प्रतिष्ठानच्या अध्यक्षा असून 'साऊ एकल महिला समिती महाराष्ट्र राज्य'च्या तालुका समन्वयक म्हणूनही कार्यरत आहेत.

तालुक्यातील एकल महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम प्रभावीपणे राबविले आहेत. महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी शिलाई मशीनचे वाटप, शेळीपालनासाठी शेळ्यांचे वितरण, आरोग्य शिबिरे, सॅनिटरी नॅपकिन वितरण तसेच गरजू कुटुंबांना कडधान्यांचे वाटप अशा विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला आहे. तसेच एकल महिलांच्या मुलांना शैक्षणिक साहित्य, उच्च शिक्षणासाठी लॅपटॉप उपलब्ध करून देत त्यांनी अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. बालकांच्या सक्षमीकरणासाठीही त्यांनी सातत्याने कार्य केले असून शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक जाणीवा निर्माण करण्यासाठी विविध मोहिमा राबवल्या आहेत. विशेष म्हणजे, त्यांना प्राप्त झालेल्या शिक्षक गुणगौरव पुरस्कारातून मिळालेली एक लाख दहा हजार रुपयांची रक्कम स्वतःसाठी खर्च न करता त्यांनी गरजू महिलांना शिवणयंत्रे देण्यासाठी वापरली.

### अहिल्यानगर जिल्ह्यात रक्ताचा भीषण तुटवडा

# जनकल्याण रक्तकेंद्राच्या कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यात रक्तपिशव्यांचा तुटवडा मोठ्या प्रमाणात असल्याने रक्तपेढीमध्ये मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. मार्च,एप्रिल,मे हा तीव्र उन्हाळ्याचा महिना असल्याने या कालावधीमध्ये शिबिरे घेतली जात नसल्याने रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे.आपण समाजाचे देणे लागतो.या उद्देशाने जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मिस्त्री यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन नालेगाव येथील जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने करण्यात आले होते.या रक्तदान शिबिरात जनकल्याण रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांनी उस्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.

या रक्तदान शिबिरात जनकल्याण रक्त केंद्राचे प्रशासकीय अधिकारी सागर उंडे,सहाय्यक प्रशासकीय अधिकारी स्मिता बडवे, अकाउंट ऑफिसर गजेंद्र सोनवणे,डॉ.गौरी जोशी,डॉ. गुलशन गुप्ता,डॉ.वसंत झेंडे, डॉ. हर्ष शाह,जनसंपर्क अधिकारी शरद बळे,अमित टकले, मयूर खरमाळे, किरण शिंदे, गणेश तनपुरे,सचिन शेडाळे, गौरव पठाडे,वेदांत हरिश्चंद्रे, रवींद्र साबळे,राहुल पुंड, गौरव बागल, आशिष लिमकर,किशोर यादव, अनिता कराळे,सुलभा पवळ आदी उपस्थित होते.

जनकल्याण रक्तकेंद्राच्या आवाहनाला प्रतिसाद देत विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर,निवृत्त पोलीस अधिकारी भास्कर टेमकर,अँड. निनाद देव, रमाकांत दिघे,विजय चव्हाण आदींनी उस्फूर्तपणे रक्तदान केले.

सागर उंडे म्हणाले,जिल्ह्यात सर्वत्र रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात असल्याने नागरिकांनी उस्फूर्तपणे रक्तदान करून रक्तदानाच्या महान कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा.रक्त हे मानवनिर्मित आहे.रक्त हे कोणत्याही फॅक्टरी तयार होत नसल्याने प्रत्येकाने सामाजिक दायित्व म्हणून रक्तदान करून समाजकार्य हातभार लावावा. असे आवाहन जनकल्याण रक्त केंद्राच्या वतीने करण्यात येत आहे.जनकल्याण रक्त केंद्राने स्वेच्छा रक्तदात्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. तरी रक्तदात्यांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून रक्ताची समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर महिला शहराध्यक्षपदी अर्चना गायकवाड यांची निवड



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या अहिल्यानगर शहराध्यक्षपदी अर्चना गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. मुंबई येथील राष्ट्रवादी भवन येथे झालेल्या कार्यक्रमात ही घोषणा करण्यात आली. खासदार निलेश लंके यांच्या शिफारशीवरून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे तसेच महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्या उपस्थितीत निवडीची घोषणा करण्यात आली.

अर्चना गायकवाड यांच्या निवडीमुळे पक्षाच्या महिला संघटनात्मक बांधणीला बळ मिळणार असल्याची भावना पक्ष पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविल्याचे सांगण्यात आले.

यावेळी अर्चना गायकवाड यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी व्यापक उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले. अहिल्यानगर शहरात महिलांसाठी विविध कौशल्यविकास कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असून महिलांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच महिलांसाठी मार्गदर्शन शिबिरे, स्वयंरोजगार आणि व्यवसायविषयक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. युवतींसाठी नोकरी विषयक विशेष मार्गदर्शन, करिअर मेळावे आणि रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

या निवडीबद्दल आमदार रोहित पवार, आमदार जितेंद्र आव्हाड, जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे, प्रदेश उपाध्यक्ष हाजी शौकत तांबोळी, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अथर खान, जिल्हा कार्याध्यक्ष सीताराम काकडे, अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष समीर पठाण, शहराध्यक्ष आलतमश जरीवाला, युवक अध्यक्ष रोहन शेलार, मावळा ग्रुपचे चंद्रकांत उजागरे, सुशांत म्हस्के, नगरसेवक योगिराज गाडे, शिवसेनेचे प्रतीक बारसे, शहर कार्याध्यक्ष अझहर शेख, मनीषा चोंदे, छाया पाचर्णे, मनीषा भलगट, जिल्हा उपाध्यक्ष मतीन शेख, सेवादल जिल्हाध्यक्ष रवी धनवटे, नीलेश मालपाणी, फय्याज तांबोळी आदींसह विविध मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# कै. लक्ष्मीताई पुंडलिक भोसले यांच्या पुण्यस्मरणानिमित्त वृक्षारोपण

## धर्मवीर संभाजी राजे प्रतिष्ठान ट्रस्टचा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम | निसर्गाचे काहीतरी देणे लागते – माजी उपमहापौर गणेश भोसले

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** धर्मवीर संभाजी राजे प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने कै. लक्ष्मीताई पुंडलिक भोसले यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त विनायक नगर, समता कॉलनी आणि शांतीनगर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

यावेळी बोलताना मनपा माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, ''पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे ऋतुमानामध्ये मोठे बदल होताना दिसत आहेत. कोणत्याही ऋतूमध्ये ऊन, वारा, पाऊस आणि थंडीचा अनियमित अनुभव येत आहे. सध्या उन्हाळ्यात वाढलेल्या तापमानामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. त्यामुळे पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण आणि संवर्धनाची लोकचळवळ उभी राहणे काळाची गरज आहे.

ते पुढे म्हणाले की, ''देशी वृक्षांच्या माध्यमातून आपल्याला २४ तास मोफत ऑक्सिजन मिळतो. प्रत्येक माणसाला जीवन जगण्यासाठी किमान दोन झाडांची गरज असते. त्यामुळे निसर्गाचे आपल्यावर मोठे ऋण आहे. या भावनेतून प्रत्येकाने वृक्षांवर प्रेम करावे आणि निसर्गाची आवड जोपासावी.

गेल्या १५ ते २० वर्षांपासून प्रभागात दरवर्षी पावसाळ्यात स्वखर्चाने किमान शंभर झाडे लावून ती जगविण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. झाडांच्या संवर्धनासाठी दोन पाण्याच्या टँकरची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली. आपल्या आईच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त वड, पिंपळ आणि लिंब यांसारखी देशी झाडे लावण्यात आली असून ती जतन करण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या वृक्षारोपण कार्यक्रमास माजी महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेवक प्रकाश भागानगरे, माजी नगरसेवक संजय चोपडा, उद्यान प्रमुख शशिकांत नजन, अवधूत फुलसौंदर, अशोक पवार, राजू यंदे, ईश्वर कोळी, रामदास खैरे, निलेश गांधी, डॉ. अभय मुथा, सुरेश डहाळे, राजेश थोरात, नरहरी सपकाळ, मुकुंद निकुंभ, राहुल बोरा, नितीन खैरे, मयूर म्हस्के, गणेश टाक, आनंद मुथा, जयकिशन दायमा, भरत फुलसौंदर, विजय फुलसौंदर, जनार्दन वाघ,



संतोष ओहोळ, रुक्मिणी नन्नवरे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर म्हणाले की, ''विकासकामांच्या माध्यमातून बुरुडगाव रोड परिसराचा मोठ्या प्रमाणात कायापालट झाला आहे. माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी उभी केलेली वृक्षारोपणाची लोकचळवळ परिसरासाठी प्रेरणादायी ठरत आहे. आज परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष दिसत असून त्यामुळे वातावरणात सकारात्मक बदल जाणवत आहे.

ते पुढे म्हणाले की, ''सध्या उन्हाच्या तीव्रतेमुळे नागरिकांना वृक्षांचे महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजले आहे. भविष्यात पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

नगरसेवक प्रकाश भागानगरे म्हणाले की, ''माजी उपमहापौर गणेश भोसले प्रभागामध्ये सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असून त्यांचे काम शहरासाठी दिशादर्शक ठरत आहे. त्यांच्या उपक्रमांचे अनुकरण इतर प्रभागांमध्येही केले जात आहे. फक्त खड्डे खोदून झाडे लावणे पुरेसे नाही, तर त्यांचे संवर्धन करणे ही आजची खरी गरज आहे.

माजी नगरसेवक संजय चोपडा यांनीही गणेश भोसले यांच्या वृक्षारोपण आणि संवर्धन उपक्रमाचे कौतुक केले. तसेच विनायक नगर, समता कॉलनी आणि शांतीनगर परिसरातील नागरिकांनी 'वृक्ष दत्तक योजना' राबवून वृक्ष संवर्धनाचा निर्धार केल्याचे त्यांनी सांगितले.

# जितो नॅशनल जॉब फेअर २०२६ ला देशभरातील युवा वर्गाचा प्रतिसाद

## अहिल्यानगर येथे नामांकित कंपन्यांमध्ये उमेदवारांना थेट नियुक्ती




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्यावतीने (जितो) रोजगार निर्मिती, युवक सक्षमीकरण आणि उद्योग क्षेत्राला सक्षम मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दि.२३ मे २०२६ रोजी पॅन इंडिया जितो नॅशनल जॉब फेअर २०२६ चे आयोजन करण्यात आले. देशभरातील विविध जितो चॅप्टर्समध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला युवक, उद्योग समूह आणि कंपन्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या राष्ट्रीय उपक्रमाचा एक भाग म्हणून जितो अहिल्यानगर चॅप्टरतर्फे २३ मे २०२६ रोजी अहिल्यानगर येथे अर्थ ७ बँक्वेट, जीसीएम टॉवर्स येथे जॉब फेअरचे आयोजन करण्यात आले. या जॉब फेअरमध्ये मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, फायनान्स, बँकिंग, मार्केटिंग, प्रशासन, तांत्रिक क्षेत्र तसेच विविध उद्योग क्षेत्रांतील नामांकित कंपन्यांनी सहभाग घेत उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

अहिल्यानगर येथे आयोजित जॉब फेअरमध्ये १० पेक्षा अधिक कंपन्यांचा सहभाग असून ६५ पेक्षा अधिक उमेदवारांनी ऑनलाईन व ऑफलाईन नोंदणी केली. त्यापैकी १५ उमेदवारांची ऑन-द-स्पॉट शॉर्टलिस्टिंग करण्यात आली असून ३० पेक्षा अधिक उमेदवारांची पुढील निवड प्रक्रिया सुरू आहे.अहिल्यानगर येथील कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जितो अहिल्यानगर चॅप्टरचे चेअरमन आलोक मुनोत, चीफ सेक्रेटरी तुषार कर्नावट, जॉब्स कन्व्हेनर प्रशांत बोगावत तसेच युथ विंग चेअरमन चेतन भंडारी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

जितो जॉब्स हा जितोचा सतत कार्यरत असलेला रोजगार प्रकल्प असून, या माध्यमातून उमेदवारांना रोजगाराच्या संधी तसेच कंपन्यांना योग्य उमेदवार उपलब्ध करून देण्याचे कार्य सुरू असते. या राष्ट्रीय जॉब फेअरमुळे हजारो युवकांना उद्योग क्षेत्राशी थेट जोडले जाण्याची संधी प्राप्त झाली.या उपक्रमाविषयी बोलताना जितो एपेक्सचे प्रेसिडेंट विजय भंडारी यांनी सांगितले की, ''जितो नॅशनल जॉब फेअर हा केवळ रोजगार मेळावा नसून युवकांना योग्य दिशा, आत्मविश्वास आणि संधी उपलब्ध करून देणारा राष्ट्रीय स्तरावरील प्रभावी उपक्रम आहे. उद्योग आणि उमेदवार यांच्यातील दरी कमी करून रोजगार निर्मितीला चालना देणे हेच या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. आजच्या युवकांना केवळ शिक्षण नव्हे तर योग्य संधीची गरज आहे आणि जितो त्या दिशेने सातत्याने कार्यरत आहे. जितो जॉब्स हा प्रकल्प भविष्यातही युवकांसाठी मोठे व्यासपीठ ठरणार आहे.''

या जॉब फेअरमुळे युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या असून उद्योग क्षेत्र आणि उमेदवार यांच्यात सकारात्मक संवाद निर्माण झाला.

# अहिल्यानगर शहरात सावेडी येथे गाडेकर हॉलमध्ये '' मार्ग सुखाचा '' कवितासंग्रहाचे प्रकाशन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** समुपदेशक,साहित्यिक व कवी भोलानाथ देवकर यांच्या ''मार्ग सुखाचा..'' या कवितासंग्रहाचे प्रकाशन सुप्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक सुनील राऊत आणि प्राचार्य डॉ. च. वि. जोशी यांच्या हस्ते सावेडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

या कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ डिझाईन प्रथम वर्ष डिझाईन पदवीची विद्यार्थिनी पियाली देवयानी कैलाश दिघे हिने साकारले असून ती पुणे येथील एम. आय. टी. स्कुल ऑफ डिझाईन महाविद्यालयात शिक्षण घेत आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ईश्वर हांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय वाघमारे यांनी केले. या प्रसंगी श्रीपाद देवकर, गाडेकर ताई, निलेश गाडेकर, सरिता देवकर, पूजा साटम, तरकसे, लोणकर, वाघमारे, अंभोरे, हांडे, वाळके भाऊ, ताई, अस्मिता भोर, इंजि व अ‍ॅड कैलाश दिघे, संपूर्ण गाडेकर परिवार आदींसह साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना ज्येष्ठ साहित्यिक सुनील राऊत म्हणाले, ''मार्ग सुखाचा..'' हा भोलानाथ देवकर यांचा अर्थपूर्ण व वाचनीय कवितासंग्रह आहे. त्यांच्या कविता जीवनमूल्ये, संस्कार, नाती आणि सकारात्मक विचार यांवर प्रभावी भाष्य करतात. अभ्यासपूर्ण विचार, समर्पक शब्दरचना आणि साधी मांडणी ही त्यांच्या कवितांची वैशिष्ट्ये आहेत. प्रत्येक कविता वाचकाला विचार करायला लावणारी आणि जीवनाला दिशा देणारी आहे.

प्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य डॉ. च. वि. जोशी यांनी सांगितले की, या संग्रहातील कविता काल्पनिक नसून रोजच्या जीवनातील प्रसंगांशी संबंधित आहेत. सोपी भाषा, ओघवती शब्दरचना आणि समर्पक मांडणी यामुळे या कविता थेट वाचकांच्या मनाला भिडतात.

प्रा. डॉ. अशोक गायकवाड यांनी आपल्या अभिप्रायात म्हटले की, ''मार्ग सुखाचा..'' हा जीवनमूल्यांची शिकवण देणारा प्रेरणादायी कवितासंग्रह आहे. ''यशाची दिशा'', ''आजचा माणूस'', ''जपा गोडवा नात्यातला'', ''कर्माचा सिद्धांत'' यांसारख्या कविता युवकांना योग्य दिशा देणाऱ्या ठरतील.

रूपचंद शिदोरे यांनी भोलानाथ देवकर यांच्या समाजाभिमुख व आध्यात्मिक विचारसरणीचे कौतुक करताना सांगितले की, ''अंतरंगातील तरंग'' नंतर प्रकाशित होणारा ''मार्ग सुखाचा..'' हा त्यांचा दुसरा कवितासंग्रह समाजाला प्रेरणा देणारा आहे. त्यांच्या कविता माणुसकी, पर्यावरण आणि संस्कारांचा संदेश देतात.

कवी भोलानाथ देवकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ''अंतरंगातील तरंग'' या पहिल्या कवितासंग्रहाला वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्यातून प्रेरणा मिळून ''मार्ग सुखाचा..'' हा दुसरा संग्रह साकारला. ''विचारातील बदल हाच विकासाचा मार्ग'' या संकल्पनेतून या कविता जन्माला आल्या असून व्यक्ती, कुटुंब आणि समाजाला सकारात्मक दिशा मिळावी हा त्यामागील उद्देश आहे.

अस्मिता भोर-देवकर यांनी कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले की, त्यांच्या वडिलांचा हा दुसरा कवितासंग्रह प्रकाशित होत असल्याचा आनंद आहे.



२६ मे रोजी झालेल्या शांतता समेतीच्या मीटिंगमध्ये कर्तव्यदक्ष शिस्तप्रिय अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन साहेब यांचा सत्कार शांतता समिती सदस्य संजय झिंजे व ऍडव्होकेट शिवाजीराव कराळे यांच्या हस्ते करण्यात आला.

### अखेर तांत्रिक कर्मचाऱ्यांना औद्योगिक न्यायालयाकडून न्याय

# सात वर्षांच्या लढ्यानंतर अन्यायकारक दंड रद्द; पगारातून कपात केलेली रक्कम परत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर सर्कलमधील तांत्रिक कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने केलेली अन्यायकारक दंडात्मक कारवाई अखेर औद्योगिक न्यायालयाने चुकीची ठरवत संबंधित कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. तब्बल सात वर्षांच्या कायदेशीर लढ्यानंतर औद्योगिक न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निकाल देत पगारातून कपात करण्यात आलेली दंडाची रक्कम परत करण्याचे आदेश प्रशासनाला दिले. तांत्रिक कामगार युनियन ५०५९ महाराष्ट्र राज्य यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा ऐतिहासिक विजय मिळाल्याची भावना कामगारांमधून व्यक्त होत आहे.

सन २०१७ मध्ये अहिल्यानगर सर्कलमध्ये सुरक्षा साधनांच्या अभावामुळे तांत्रिक कर्मचारी आंदोलन करत होते. काम करताना आवश्यक असलेली सुरक्षा साधने उपलब्ध करून द्यावीत, अशी कर्मचाऱ्यांची मागणी होती. त्यावेळी प्रशासनाने सुरक्षा साधनांचा साठा उपलब्ध नसल्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, ग्रामीण विभागाच्या स्टोअरमध्ये मोठ्या प्रमाणात सुरक्षा साधने शिल्लक असल्याची माहिती काही कर्मचाऱ्यांना मिळाल्यानंतर त्यांनी संबंधित स्टोअरला भेट देऊन पाहणी केली. या पाहणीत मोठ्या प्रमाणात सुरक्षा साहित्य उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाल्याने कर्मचाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

या घटनेदरम्यान स्टोअर इंचार्ज सहाय्यक अभियंता श्री. भरत पवार व उपकार्यकारी अभियंता श्री. साळुंखे यांच्यासोबत कर्मचाऱ्यांचे शाब्दिक वाद झाले. मात्र, कर्मचाऱ्यांची बाजू समजून घेण्याऐवजी प्रशासनाने संबंधित कर्मचाऱ्यांवरच कारवाईचा बडगा उगारला. सत्य परिस्थिती समोर आणणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्रत्येकी ५१ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. या निर्णयामुळे कामगारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती.

प्रशासनाने दंडाची वसुली संबंधित कर्मचाऱ्यांच्या पगारातून सुरू केली होती. वर्ग-३ कर्मचारी श्री. शंकर बबन जारकड यांच्या वेतनातून दोन टप्प्यांत २५ हजार ५०० रुपयांची कपात करण्यात आली. तसेच वर्ग-४ कर्मचारी श्री. शंकर दीपाजी चव्हाण, श्री. संतोष केशव शेलार, श्री. अमोल गोरक्षनाथ गरूडकर आणि श्री. प्रवीण ज्ञानदेव जठार यांच्या वेतनातून प्रत्येकी १७ हजार रुपयांची कपात करण्यात आली होती. आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या कर्मचाऱ्यांवर ही कारवाई अन्यायकारक असल्याची भावना संघटनेकडून व्यक्त करण्यात आली होती.

या अन्यायाविरोधात तांत्रिक कामगार युनियन ५०५९ महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून केंद्रीय उपाध्यक्ष श्री. सतीश दादा भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली संबंधित कर्मचाऱ्यांनी औद्योगिक न्यायालयात धाव घेतली. २०१८ ते २०२५ या कालावधीत या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. अखेर औद्योगिक न्यायालयाने संबंधित तांत्रिक कर्मचाऱ्यांची कोणतीही चूक नसल्याचे स्पष्ट करत प्रशासनाची दंडात्मक कारवाई चुकीची ठरवली. तसेच पगारातून वसूल करण्यात आलेली रक्कम तात्काळ परत करण्याचे आदेश दिले.

औद्योगिक न्यायालयाच्या आदेशानुसार मागील दोन महिन्यांत संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यात कपात करण्यात आलेली दंडाची रक्कम पुन्हा जमा करण्यात आली. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर पैसे पुन्हा खात्यात जमा झाल्याने दंडात्मक कारवाई झालेल्या कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्टपणे दिसून आला. न्याय मिळाल्याची भावना संबंधित कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

या विजयामागे केंद्रीय उपाध्यक्ष श्री. सतीश दादा भुजबळ यांच्यासोबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचेही महत्त्वपूर्ण योगदान ठरले. संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच हे प्रकरण औद्योगिक न्यायालयात यशस्वीरीत्या लढवता आले, अशी भावना कामगारांनी व्यक्त केली. तसेच कामगार प्रकरणातील ॲडव्होकेट श्री. जोशी यांनी या प्रकरणाचे कायदेशीर कामकाज प्रभावीपणे हाताळले.

औद्योगिक न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर तांत्रिक कामगार युनियन ५०५९ महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत ॲडव्होकेट श्री. जोशी यांना वकिली फी देण्यात आली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे आभार मानत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. या संपूर्ण लढ्यात संघटनेने कामगारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत पुन्हा एकदा आपल्या कामगारांना न्याय मिळवून देण्याची भूमिका अधोरेखित केली आहे.

''सत्याचा विजय उशिरा का होईना, पण नक्की होतो,'' अशी भावना निकालानंतर तांत्रिक कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

# पोटगीच्या न्यायासाठी महिलेचे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण

## 'कोर्टाच्या वॉरंटची अंमलबजावणी होत नाही'; सोनई पोलिसांवर महिलेचे गंभीर आरोप




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** न्यायालयाने मंजूर केलेल्या पोटगीच्या वॉरंटची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करत रुपाली गोरक्षनाथ डोळे या महिलेने आपल्या लहान मुलासह जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. सोनई पोलीस स्टेशनमधील काही पोलिस कर्मचारी जाणीवपूर्वक पतीला संरक्षण देत असून न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी टाळत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी निवेदनातून केला आहे.

रुपाली डोळे या मूळच्या नेवासा तालुक्यातील वंजारवाडी येथील असून सध्या त्या पाथर्डी तालुक्यातील चिंचोडी शिराळ येथे वास्तव्यास आहेत. त्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, पती गोरक्षनाथ आसाराम डोळे यांनी त्यांना नांदविण्यास नकार देत मारहाण केली तसेच विष पाजून जीव घेण्याचाही प्रयत्न केला होता. त्यानंतर त्यांनी स्वतःसह मुलगा शिवम गोरक्षनाथ डोळे याच्या उदरनिर्वाहासाठी पाथर्डी न्यायालयात अन्न-वस्त्र पोटगीसाठी क्रिमिनल अर्ज क्रमांक २२/२०२४ दाखल केला होता.

या प्रकरणात न्यायालयाने रुपाली डोळे व त्यांच्या मुलासाठी दरमहा चार हजार रुपयांची पोटगी मंजूर केली. मात्र पती गोरक्षनाथ डोळे यांनी न्यायालयाच्या आदेशानुसार पोटगीची रक्कम भरली नाही तसेच न्यायालयातही हजर राहिले नाहीत. त्यामुळे न्यायालयाने त्यांच्या विरोधात एक लाख २१ हजार रुपयांच्या वसुलीसाठी वॉरंट काढले. हे वॉरंट बजावणीसाठी सोनई पोलीस स्टेशनकडे पाठविण्यात आले होते.

मात्र संबंधित पोलिस कर्मचारी वॉरंटची अंमलबजावणी करत नसल्याचा आरोप रुपाली डोळे यांनी केला आहे. वंजारवाडी बिटचे हेड कॉन्स्टेबल राख, पवार व कासार हे जाणीवपूर्वक कारवाई टाळत असून हेड कॉन्स्टेबल राख हे गोरक्षनाथ डोळे यांचे नातेवाईक असल्याने खोटे अहवाल न्यायालयात सादर केले जात असल्याचा आरोप त्यांनी निवेदनात केला आहे.

महिलेने आणखी गंभीर आरोप करताना सांगितले की, वॉरंट बजावणीसाठी हेड कॉन्स्टेबल यांना पैसे दिले. मात्र तरी देखील ते उडवाउडवीचे उत्तर देत आहे. रुपाली डोळे यांनी पुढे म्हटले आहे की, पोटगीची वसुली टाळण्यासाठी गोरक्षनाथ डोळे यांनी आपल्या नावावरील वंजारवाडी येथील गट क्रमांक १६० मधील ४१ आर जमीन पुतण्याच्या नावावर बोगस खरेदीखताद्वारे वर्ग केली. ही मालमत्ता जप्त होऊ नये आणि पोटगीची वसुली टाळता यावी, यासाठी हा प्रकार करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच गोरक्षनाथ डोळे हे प्रत्यक्षात वंजारवाडी येथे राहत असतानाही पोलिसांकडून ''तो गावात राहत नाही'' असे खोटे अहवाल दिले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. वॉरंट आल्याची माहिती मिळताच पोलिसांकडून त्यांना नातेवाईकांकडे पळून जाण्याचा सल्ला दिला जात असल्याने कारवाई होत नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

# हिंदू मेहतर–वाल्मिकी समाजासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करा

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना वाणे यांचे निवेदन । 'समाजाच्या आर्थिक–सामाजिक उन्नतीसाठी स्वतंत्र विकास महामंडळाची गरज

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंदू मेहतर/वाल्मिकी समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी स्वतंत्र ''महर्षी वाल्मिकी मेहतर आर्थिक विकास महामंडळ'' स्थापन करण्यात यावे, अशी मागणी भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष किशोर वाणे व ॲड. कुणाल वाणे यांनी पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे. या संदर्भात राज्य सरकारकडे विशेष पाठपुरावा करण्याची विनंतीही त्यांनी केली.

शिर्डी येथे आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानादरम्यान किशोर वाणे यांनी पालकमंत्री विखे पाटील यांची भेट घेत निवेदन दिले. यावेळी भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, भाजप जिल्हा सरचिटणीस निखिल वारे, अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष संजय गायकवाड, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, ॲड. देवेंद्र बंब, भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा सरचिटणीस सुनिल सकट, अंशुमन वाणे आदी उपस्थित होते.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, हिंदू मेहतर/वाल्मिकी समाजाने गेल्या अनेक शतकांपासून हिंदू धर्माची परंपरा जपत साफसफाईचे काम प्रामाणिकपणे केले आहे. मात्र या समाजाला दीर्घकाळ सामाजिक उपेक्षा, आर्थिक अडचणी आणि शैक्षणिक मागासलेपणाचा सामना करावा लागला आहे. आजही समाजातील मोठा वर्ग बेरोजगारी, आर्थिक अस्थिरता आणि मूलभूत सुविधांच्या अभावाशी झुंज देत असल्याचे वाणे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रात हिंदू मेहतर/वाल्मिकी समाजाची लोकसंख्या २५ लाखांपेक्षा अधिक असून समाजातील युवक, महिला, छोटे व्यावसायिक आणि बेरोजगारांना विशेष आर्थिक मदत, स्वयंरोजगाराच्या संधी आणि कौशल्य प्रशिक्षणाची अत्यंत गरज आहे. सध्या विविध शासकीय योजनांचा लाभ समाजापर्यंत अत्यल्प प्रमाणात पोहोचत असल्याने स्वतंत्र आर्थिक महामंडळ स्थापन करणे काळाची गरज असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यात विविध समाजांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळे कार्यरत आहेत. त्यामध्ये शबरी आदिवासी वित्त विकास महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, परशुराम आर्थिक विकास महामंडळ आदींचा उल्लेख करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर हिंदू मेहतर/वाल्मिकी समाजासाठीही स्वतंत्र ''महर्षी वाल्मिकी मेहतर आर्थिक विकास महामंडळ'' स्थापन करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या महामंडळाच्या माध्यमातून समाजातील युवकांना रोजगार निर्मिती, महिलांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत तसेच लघुउद्योगांसाठी कर्ज योजना उपलब्ध होऊ शकतील, असा विश्वास किशोर वाणे व ॲड. कुणाल वाणे यांनी व्यक्त केला. यामुळे समाजाचा सरकारवरील विश्वास अधिक दृढ होईल आणि समाज मुख्य प्रवाहात येण्यास मदत होईल, असेही म्हंटले आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

(पान १ वरुन)

## गोदावरी पात्रातून तीन ट्रॅक्टरसह साडेपंधरा लाखांचा मुद्देमाल जप्त

(दोघेही रा. सुरेगाव ता.कोपरगांव) फरार आहेत.

दिनांक २६ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कोपरगाव तालुका हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत असताना पथकास सुरेगाव येथील चक्रधर स्वामी मंदिराजवळील गोदावरी नदीपात्रात काही लोक ट्रॅंक्टर व क्रेनच्या सहाय्याने वाळूचा अवैध उपसा करीत असल्याची माहिती मिळाली. पथकाने सुरेगाव शिवारात गोदावरी नदीपात्रात जाऊन खात्री केली असता काही लोक ट्रॅंक्टर व क्रेनच्या सहाय्याने वाळूउपसा करीत असल्याचे दिसून आले. पथकाने छापा टाकून दोघांना पकडले तर दोघे पळून गेले. आरोपीकडून १५ लाख रुपयांचे तीन ३ ट्रॅंक्टर, ७५ हजार रुपयांची वाळू उपशाकरिता वापरण्यात येणारी लोखंडी केनी असा एकूण १५ लाख ७५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

आरोपीविरुध्द कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), सह पर्यावरण संरक्षण कायदा कलम ३,१५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पुण्याच्या आंदेकर टोळीतील पाचजण मिरावली पहाड परिसरातून अटकेत

(वय २२ वर्षे, रा. कोंढवा, आश्रमनगर, पुणे), विराट उर्फ विल्यम रविंद्र मेहंदळे (वय २६ वर्षे, रा. काकडे वस्ती, कोंढवा, पुणे), समर्थ बाबासाहेब माडळकर (वय १९ वर्षे, रा. काकडे वस्ती, कोंढवा, पुणे), समर्थ राजेंद्र दुधभाते (वय १८ वर्षे, रा. काकडे वस्ती, कोंढवा, पुणे) अशी असून, पळून गेलेल्याचे नावे आकाश संजय पवार (रा. ब्रम्हतळे, रा. भिंगार, ता. जि. नगर) असे आहे.

अंगझडतीत १ गावठी कट्टा, १ जिवंत काडतूस, कोयता, चाकू, मोबाईल असा एकूण १ लाख ७१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपीविरुध्द भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१०(४), ३१०(५), सह आर्म ॲक्ऍट कायदा कलम ३/२५, ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शवविच्छेदनासाठी पैशांची मागणी

नातेवाईकांवर अशा प्रकारे आर्थिक अन्याय होणे अत्यंत संतापजनक आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतिश लोंढे यांनी स्वतः रुग्णालयात येऊन आंदोलकांशी चर्चा करावी, अशी मागणी केली होती. मात्र डॉ. लोंढे यांनी फोनवरून चर्चा करत संबंधित दोषींवर योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले. वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांसोबत बैठक असल्याने आपण पारनेरला येऊ शकत नसल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. लोंढे यांच्या भूमिकेचा निषेध करत आंदोलनकर्त्यांनी त्यांच्या खुर्चीला पुष्पहार अर्पण करून गांधीगिरी आंदोलन केले. प्रशासनाने चौकशीचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असले, तरी दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.